महाराष्ट्र कृषि सेवा गट-ब संवर्गातील पदोन्नती नाकारणेबाबत.
**श्री.महेश दिनकर शिंदे, जिल्हा कृषि अधिकारी**

**महाराष्ट्र शासन**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मस्त्यव्यवसाय विकास विभाग**
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई-३२.
शासन निर्णय क्र. आकृवि- २४२६/प्र.क्र.२८/१५-अे
दिनांक : १५ मे, २०२६

संदर्भ:- १) कृषि व पदुम विभाग, शासन आदेश, क्र.आकृवि-२४२५/प्र.क्र.१६/१५-अे, दि.०९.१२.२०२५
२) कृषि आयुक्तालयाचे पत्र जा.क्र.कृआ/एवायझेड/पदो/निसू २४-२५/आस्थापना-१/६३, दि. २३.०१.२०२६.

**प्रस्तावना :-**

कृषि अधिकारी, गट-ब (कनिष्ठ) संवर्गातील अधिकाऱ्यांना महाराष्ट्र कृषि सेवा गट-ब (वेतनस्तर एस-१६, रु.४४९००-१४२४००) या संवर्गात दि.०९.१२.२०२५ रोजीच्या आदेशान्वये पदोन्नती देण्यात आलेली आहे. पदोन्नती देण्यात आलेल्या अधिकाऱ्यांपैकी श्री.महेश दिनकर शिंदे यांनी पदोन्नती नाकारत असल्याचे लेखी कळविले आहे. त्यानुसार कृषि आयुक्तालयाने त्यांची पदोन्नती रद्द करण्याबाबतचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी सादर केला आहे. कृषि आयुक्तालयाच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने शासनाने आता पुढील निर्णय घेतला आहे.

**शासन निर्णय :-**

कृषि अधिकारी, गट-ब (कनिष्ठ) संवर्गातील अधिकाऱ्यांना दि.०९.१२.२०२५ रोजीच्या आदेशान्वये महाराष्ट्र कृषि सेवा गट-ब (वेतनस्तर एस-१६, रु.४४९००-१४२४००) संवर्गात देण्यात आलेली आहे. त्यातील खालील अधिकाऱ्यांनी पदोन्नती नाकारली आहे.

| अ. क्र. | कृषि पर्यवेक्षकाचे नाव व सध्याचे कार्यालय | पदोन्नतीने पदस्थापनेचे कार्यालय | पदोन्नती नाकारण्याचे कारण |
|---|---|---|---|
| १ | श्री.महेश दिनकर शिंदे,<br>कृषि अधिकारी | जिल्हा कृषि अधिकारी (मग्रारोहयो), जि.प.सांगली | कौटुंबिक कारणास्तव |

२. तरी उपरोक्त अधिकाऱ्यांनी पदोन्नती नाकारली असल्याने त्यांची खालील नमूद अटींच्या अधीन राहून पदोन्नती रद्द करण्यात येत आहे.

१) उपरोक्त प्रमाणे पदोन्नती नाकारलेल्या कृषि अधिकारी यांचे नाव सन २०२४-२५ च्या निवडसूचीतून वगळण्यात यावीत.

२) पुढील दोन वर्षे होणाऱ्या निवडसूचीमध्ये (सन २०२५-२६ व सन २०२६-२७) उपरोक्त कृषि अधिकारी यांच्या नावाचा पदोन्नतीसाठी विचार न करता तिसऱ्या वर्षाच्या निवडसूचीत त्यांची पदोन्नतीसाठीची पात्रता तपासण्यात येईल.

३) उपरोक्त कृषि अधिकारी यांची महाराष्ट्र कृषि सेवा गट-ब संवर्गातील पदावरील सेवाज्येष्ठता ही, ज्यावेळी ते पुढील पदोन्नतीस पात्र ठरतील व प्रत्यक्ष पदोन्नतीच्या पदावर रुजू होतील त्या दिनांकापासून विचारात घेतली जाईल.

४) उपरोक्त कृषि अधिकारी यांना दि.०९.१२.२०२५ रोजीच्या आदेशान्वये पदोन्नती दिलेल्या निवडसूचीतील अधिकाऱ्यांचा व त्यानंतरच्या दोन निवडसूचीतील अधिकाऱ्यांचा मानीव दिनांक प्राप्त होणार नाही.

५) उपरोक्त कृषि अधिकारी यांना आश्वासित प्रगती योजनेचे लाभ प्रदान केले असल्यास त्याबाबत वित्त विभाग, शासन निर्णय दि.०२.०३.२०१९ मधील तरतूदीनुसार सदर लाभ काढून घेण्याची कार्यवाही तात्काळ करावी.

३. आयुक्त (कृषि) यांनी सदर आदेशाची तात्काळ अंमलबजावणी करावी.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०५१५१०५२१३२२०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

VISHAL DATTATRAY TEKE

Digitally signed by VISHAL DATTATRAY TEKE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Agriculture and Adf Dept, 2.5.4.20=B1A35A7424E4C5B594D9CB1798AC47CF07D8F7D496693EFC58A7720A5CDAFC92, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=8EB1C9B88DDF43C0CCD87A95BD631AD3EE730CDB839A8115F112376617EAE32F, cn=VISHAL DATTATRAY TEKE
Date: 2026.05.15 10:53:37 +05'30'

**( विशाल टेके )**

**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत:-**

१. मा.मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. अपर मुख्य सचिव (कृषि) यांचे स्विय सहायक, कृषि व पदुम विभाग,मंत्रालय, मुंबई
३. आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, पुणे
४. विभागीय कृषि सहसंचालक, पुणे
५. सहसंचालक (आस्थापना), कृषि आयुक्तालय, पुणे
६. संबंधित कृषि अधिकारी (मार्फत कृषि आयुक्तालयामार्फत)
७. निवडनस्ती (१५-अे)